**संतोष साळुंखे वि. हणमंत सावंत व इतर**

**आदेश निशाणी क्रमांक २३ वर**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ व २ यांनी कैफियत व म्हणणे देण्यास झालेला विलंब तसेच, त्यांचे विरुध्द झालेला विनाकैफियत आदेश रद्द होऊन मिळण्याकरीता केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जास वादींनी म्हणणे दाखल करुन आक्षेप दर्शविला आहे.

३. प्रतिवादीच्या मते, कोव्हीड १९ या जागतीक महामारीने व लॉकडाऊनची परिस्थिती असलेने प्रतिवादींना वेळेत वकीलांशी संपर्क साधून कागदपत्रांची पुर्तता करता आले नाही. त्यामुळे त्याच्याविरूध्द विनाकैफियतीचा आदेश पारित करण्यात आला. सबब, न्यायाच्या दृष्टीने त्यांच्याविरुध्द पारीत केलेला विनाकैफियतीचा आदेश रद्द करण्यात येऊन कैफियत दाखल करुन घेण्यात यावी अशी प्रतिवादी याने विनंती केली आहे.

४. वादीच्या मते, सदर अर्जावरीत न्यायाच्या दृष्टीने योग्य ते आदेश व्हावेत अशी विनंती केली आहे.

५. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा डिक्लेरेशनसाठी, अतिक्रमण बाधीत क्षेत्राचा कब्जा मिळणेसाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. दि. १७.१२.२०२० रोजी प्रतिवादी क्र. १ व २ प्रस्तुत दाव्यात हजर झाले. प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक २३/०३/२०२१ रोजी दाखल केला आहे. परंतु दाव्याचा निकाल गुण दोषावर लागण्याकरिता प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर येणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादींस संधी दिल्यास ते न्यायोचित होईल. प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर दाखल झाल्यास वादीला प्रस्तुतच्या दाव्याकामी कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु प्रस्तुत प्रकरणामध्ये झलेला विलंब व त्या अनुषंगाने वादीची झालेली गैरसोय याबाबत योग्य त्या खर्चाची रक्कम भरणे गरजेचे आहे. तसेच, प्रतिवादींनी सदर अर्जासोबत नि. २४ ला प्रतिज्ञापत्र दाखल केल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रतिवादीची कथने मान्य करणेस कोणतीही हरकत दिसून येत नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रु. ५००/– खर्चाने मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी खर्चाची रक्कम वादीला पुढील तारखेस देण्याची आहे.

३. प्रतिवादी क्र. १ व २ यांचे म्हणणे व कैफियत अभिलेखावर नोंद करण्यात येते.

४. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर )

स्वाक्षरी/–

दिनांक– ०४/०१/२०२२ श्री. एम. आर. कामत

ठिकाण– पंढरपूर प्रभारी ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पंढरपूर

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this PDF file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment / Order.

| | | |
|---|---|---|
| Court | : | Jt. C. J. J. D. & J. M. F. C. Pandharpur |
| Name of Stenographer | : | M. P. Gheradi. |
| Date | : | 04.01.2022 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 04.01.2022 |
| Judgment/Order uploaded on | : | 05.01.2022 |